जा. न. / नगररचना विभाग / अंतीम /९०

दिनांक १४/०५/ 2002

प्रति, श्री रतन रामचंद्र पगार व इतर, कारं. मार्फ. श्री. व्ही. काळे, मा.
रा. मु. पो. ... साम... क्र. ३.९,

विषयः- नाशिक शिवारातील स. नं. / ... ५५४ + ५५५/२ मोजणी नकाशाप्रमाणे व ७/१२ उताऱ्याप्रमाणेचे जागेतील प्लॉट नं. १ ते ४५ चा लेआऊट नकाशा अंतीम मंजूरी करणेबाबत

संदर्भः- तुमचा दिनांक ८/३/2002 चा अर्ज व नकाशे.

महाशय,

वरील संदर्भान्वये कळविण्यात येते की, नाशिक शिवारातील स. नं. ५५४ + ५५५/२ ... ७/१२ च्या उताऱ्याप्रमाणे जागेतील नियोजित लेआऊटच्या मोजणी नकाशा प्रमाणे ... नकाशा सोबतच्या तुमच्या अर्जाने ... आ. क्र. एल. एन. ओ. / डब्ल्यू एस. /२९३/ ४८९८ — / — / दिनांक ५.१०.९९ अन्वये टेंटटिव्हली मंजूरी प्लॉट नंबर १ ते ९९ अनुसार मंजूरी देण्यात आली होती. त्यानंतर तुम्ही सदर शर्तीनुसार सदर नियोजित लेआऊट प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून, प्लॉटस रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे कायमचे दगड रोवून सदर कॉलनी मध्ये कॉलनी रस्ते तयार करून दिले आहे त्याच प्रमाणे पाईप लाईन करीता रक्कम रुपये ३,४४,३२०.०० पावती क्र. / बुक क्र. ४५/००५६ दिनांक ३/५/2001 अन्वये या कार्यालयास भरलेली आहे.

सबब तुम्ही सदर नियोजित टेंटटिव्हली मंजूर लेआऊटचे शर्तीनुसार योग्य ती पूर्तता केलेमुळे सदर जागेतील लेआऊटच्या नकाशास अंतिम मंजूरी (फायनल लेआऊट) खालील शर्तीवर देण्यात येत आहे.

— शर्ती —

१) सदर कॉलनीतले प्लॉट, रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे दगड हालवू नये व मंजूर लेआऊट प्रमाणे कोणतेही प्लॉटचे ... जागेवर ... मोजले असता ... अधिक भरणा ... नये.

२) मंजूर लेआऊट मधील कोणत्याही प्लॉटचा उपयोग फक्त राहणेसाठी करावा. अन्य कोणताही वापर, या कार्यालयाची परवानगी घेतले शिवाय करू नये

३) मंजुर लेआऊट मधील कोणतेही प्लॉटचे यापुढे उपविभाजन करणे किंवा एकत्रीकरण करणे झाल्यास इकडील पूर्व परवानगीशिवाय करू नये

४) मंजूर लेआऊटमधील प्लॉटमध्ये बांधकाम करणेपूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी (बांधकाम परवानगी) घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करू नये.

५) सदर कॉलनी मध्ये तुम्ही पाण्याची लाईनसाठी रक्कम भरलेली असली तरी म. न. पा. ची सदर भागातील पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याशिवाय पूर्ण कॉलनीत पाणी पुरवठा केला जाणार नाही.

६) मंजूर लेआऊट मधील रस्ते व खुल्या जागा नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात दिनांक २५.२.२ ... व्या खुल्या जागेचे क्षेत्र २५५०.०० चौ मीटर करारान्वये भरलेले आहे.

७) सदर लेआऊटमध्ये आपण पथदीपांची व्यवस्था विद्युत विभाग पत्रक /विद्यु/५०/९८ / / / दिनांक ३१.०३.२००० अन्वये केलेली असून सुपरव्हिजन चार्जेस रक्कम रुपये ६५,९६५.०० पावती क्र. ०९३ बुक क्रमांक ५४१ दिनांक १४.३.२० अन्वये भरलेली आहे

८) सदरहू अभिन्यास हा. ना. ज. क. म. कार्यालयाकडील पत्र क्र. —
दिनांक — ला अधिन राहून देणेत येत आहे.

९) खुली जागा व रस्त्यांच्या/ क्षेत्रांचा ७/१२ वेगळा करून त्यावर मनपा नाशिक यांचे नांव, इमारत परवानगी पूर्वी लावणेत यावे.

१०) भुखंड क्र. १२, १९ व २० मधून जाणारी इलेक्ट्रीक लाईन हलविल्याशिवाय वरील भुखंडांना बांधकाम परवानगी दिली जाणार नाही.

११) भुखंड क्र. ४८ मधील नाल्याचे काम व जमीन सपाटीकरण व्यवस्थितरित्या जो पर्यंत पूर्ण होत नाही तो पर्यंत ह्या भुखंडांना बांधकाम परवानगी दिली जाणार नाही.

वरील शर्ती नुसार सदरचे लेआऊट नकाशास अंतीम मंजूरी देणेत येत आहे. सोबत मंजूर लेआऊट नकाशाच्या प्रति जोडल्या आहेत.

सहाय्यक संचालक नगररचना,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत माहितीसाठी–
१) अध्यक्ष,
आर्की व इंजिनिअर्स असो.
नाशिक

२) अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
ना. ज. क. म. नाशिक